सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय वाजराबाद, नांदेड

दुरध्वनी क्रमांक: 02462-244474, 234255 फॅक्स क्रं 02462-235103
E mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

पीआरओ तळमजला खोली क्रमांक -17
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड-431601

# प्रेसनोट

**दिनांक** : 03.09.2025

## मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांचे हस्ते डीजे मुक्त श्रीगणेशोत्सव साजरा करणाऱ्या सिंदखेडच्या आठ गणेश मंडळांचा सत्कार...

नांदेड जिल्हयात साजरा होणाऱ्या श्रीगणेशोत्सव अनुषंगाने **मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड** यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत शांतता कमीटीच्या मिटींगा, बैठका घेण्याची प्रक्रिया चालु असुन त्यात डिजे मुक्त श्रीगणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी साजरा होणारा श्रीगणेशोत्सव डीजे मुक्त वातावरणात साजरा करण्यासाठी केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत सिंदखेड पोलीस स्टेशन हद्दीतील 1. श्री संत सावता माळी गणेश मंडळ 2. छत्रपती शिवाजी महाराज गणेश मंडळ 3. श्री समता गणेश मंडळ 4. श्री अष्टविनायक गणेश मंडळ 5. श्री अण्णाभाऊ साठे गणेश मंडळ 6. श्री शिवनेरी गणेश मंडळ 7. महालक्ष्मी गणेश मंडळ 8. जय श्रीराम गणेश मंडळाच्या पदाधिकारी यांनी पुढाकार घेवुन यंदाची गणेशोत्सव मिरवणुक डीजे मुक्त वातावरणात काढण्याचा संकल्प करून पारंपारिक ढोल वाद्य, झांज पथक, भजनी मंडळी यांच्या वापरास प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच सदर गणेश मंडळ पदाधिकारी यांनी गणेश विसर्जनाच्या मिरवणुका हया पोलीस बंदोबस्ताशिवाय शांततेत पार पाडणार बाबत सांगीतले आहे. सदर गणेश मंडळानी घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत करून संबधित मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांचा दिनांक 03 सप्टेंबर, 2025 रोजी **मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड** यांनी मंथन हॉल पोलीस अधीक्षक कार्यालय येथे सत्कार केला व सन्मान पत्र देवुन गौरव केला.

न्यायालयाच्या सुचनेनुसार आणि डिजे मुक्त गणेश उत्सव साजरा करण्याचे प्रशासनाने चांगले नियोजन केले आहे. नांदेड जिल्हयात सण उत्सव काळात शांतता राखुन उत्तम नियोजन केले जाते. सण उत्सव काळात डिजेचा वापर न करता पर्यावरणपूरक उत्सव साजरे करून चांगला आदर्श निर्माण करता येतो. उत्सव काळात गणेश मंडळांनी दिलेल्या सुचनेचे योग्य पालन करावे, वेळेचे बंधन पाळावे, सर्व धर्माचा आदर करून डिजे मुक्त गणेश उत्सव शांततापुर्वक साजरा करावा असे **मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड** यांनी आवाहन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड